# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे


२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१.

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

Email : directorbarti@gmail.com Website : http//:barti.maharashtra.gov.in


**अनुसूचित जातीच्या अनुसूचीतील मांग, मातंग, मिनिनमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारूडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारूडी समाजातील युवक- युवतींसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इ मध्ये लिपिक वर्गीय स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मोफत प्रशिक्षण**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेकडून अनुसूचित जाती मधील मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी समाजातील युवक-युवतींसाठी बँक,रेल्वे, एल.आय.सी.इ.मध्ये लिपिक व त्या समकक्ष पदाच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्वतयारीसाठी चार महिन्याच्या कालावधीचे (निवास व भोजन व्यवस्थेसह) मोफत प्रशिक्षण कार्यक्रम (कोचिंग क्लासेस) खाजगी संस्थेच्या माध्यमातून **पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अकोला व ठाणे** या ठिकाणी राबविण्यात येणार आहे. या प्रत्येक प्रशिक्षण केंद्रावर वर नमूद जातीमधील ५० युवक- युवतींना प्रवेश देण्यात येईल. ३०% जागामांग व वर नमूद तत्सम जातीतील महिलांकरिता राखीव आहेत. ३% जागामांग व वर नमूद तत्सम जातीतील नि:समर्थ (अपंग) (Person With Disability) व्यक्तींसाठी राखीव आहेत.

वरील जातीच्या इच्छुक व पात्र युवक-युवतींना https://barti.maharashtra.gov.in या वेब साईटवरून 'Notice Board च्या सदराखाली Coachings- Mang- Matang लिंकवरून अर्ज डाऊन लोड करून किंवा खालील नमुद संस्थेच्या कार्यालयातून प्राप्तकरून, खालील पैकी ज्याठिकाणी त्यांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्या ठिकाणी असलेली खालील नमूद संस्थांकडे **दि.२० फेब्रुवारी, २०१६** पर्यंत परिपूर्ण भरलेला अर्ज कागद पत्रांसह सादर करावा.

| अ.क्र. | खाजगी संस्थेचे नांव, पत्ता व मुख्यालय – ठिकाण | अ.क्र. | खाजगी संस्थेचे नांव, पत्ता व मुख्यालय – ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | **स्वप्नपूर्ती सेवाभावी संस्था**<br>व्हिजन ॲकडमी, गौरी गणेश अपार्टमेंट १ ला मजला श्रीमंत पेशवाई कलेक्शन जवळ कुमठेकर रोड, सदाशिव पेठ, पुणे-३० मो. नं.८९७५७८५६६४, दुरध्वनी क्रमांक-०२०/२४४८६००७.<br>**ठिकाण – पुणे.** | २ | **चक्रधर स्वामी सेवाभावी व शैक्षणिक संस्था नाशिक**<br>फतेह हॉस्टेल, शंकरनगर, टाकळी रोड,<br>नाशिक-४२२००१ मोबाईल क्रमांक:- ९६८९९९८४४४<br>**ठिकाण – नाशिक** |
| ३ | **महाराष्ट्र मातंग विकास मंडळ**<br>प्लॉट नं.१०५ आराधना सोसायटी इंडियन इंन्स्टिटयूट ऑफ कॉलेज बाजूला, एच.पी पेट्रोल पंपाजवळ, गोदनी रोड, नागपूर. मो. नं.७७६९०७५६६५, ९३७२०९०६३६.<br>**ठिकाण – नागपूर.** | ४ | **आस्मिता मागास वर्ग बहुउद्देशीय विकास व संशोधन संस्था, अकोला.**<br>स्पर्धा परिक्ष केंद्र बाजोरीया नगर, हिंगणा रोड, अकोला.<br>मोबाईल क्रमांक:-९५०३०२००११<br>**ठिकाण – अकोला.** |
| ५ | **श्री. जी बहुउद्देशीय संस्था**<br>प्लॉटनं.५, एम. आय. डी. सी. स्टेशनरोड, ता. जि. औरंगाबाद. मोबाईल क्रमांक :- ८८८८७८८७५६, ९९२१६००२९९<br>**ठिकाण – औरंगाबाद.** | ६ | **मानसी महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था, ठाणे.**<br>ओम को ऑपरेटीव्ह सोसायटी, बिल्डींग नं- ४, अशोक वन सोसायटी, निमकर नाका नगर , मनसे ऑफिस टिटवाळा ईस्ट, जिल्हा, ठाणे. मोबाईल क्रमांक :- ९०२९०११८१८<br>ई – मेल- mansimahila९१@gmail.com **ठिकाण – ठाणे.** |

**योजनेच्या अटी व शर्ती :**

१. उमेदवार हा मांग किंवा वर नमूद तत्सम जातीचा असावा.
२. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा
३. उमेदवाराचे वय १८ ते ३५ पर्यंत असावे.
४. उमेदवार किमान १२ वी पास असावा.
५. निवड केलेल्या उमेदवाराची प्रशिक्षणा दरम्यान निवासाचा व भोजनाच्या खर्चासाठी शासन निर्णयानूसार 'बार्टी' कडून वर नमूद संबंधित संस्थेला निधी देण्यात येईल व उमेदवारासाठी नि: शुल्क निवास व भोजन व्यवस्था संबंधित संस्थामार्फत करण्यात येईल.
६. उमेदवारांना 'बार्टी', मार्फत लिपिक स्पर्धा परिक्षा तयारीसाठी रु.३०००/- किंमतीचे पुस्तकांचा संच देण्यात येणार आहे.
७. विहित नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रांसहीत प्रशिक्षण संस्थेकडे अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांपैकी पात्र उमेदवाराची त्या त्या संस्थेच्या ठिकाणी संस्थेच्या परिसरात किंवा संस्थेनी सुचविलेल्या इतर परिसरात **दिनांक २८/०२/२०१६ रोजी चाळणी परिक्षा** घेऊन त्यामधून उमेदवारांची गुणानुक्रमे निवड करून प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात येईल.
८. संबंधित प्रशिक्षण संस्थेकडे अर्ज दाखल करण्याची **अंतिम दिनांक २० फेब्रुवारी, २०१६** असा आहे.
९. सदर प्रशिक्षण दि.०१/०३/२०१६ पासून किंवा त्यानंतर लवकरात- लवकर सुरू करण्यात येईल.

**अर्जा सोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१. उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.
२. जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.
३. इ. १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिका प्रत व इतर शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.
४. शाळा सोडल्याचा दाखला किंवा वास्तव्याच्या योग्य पुराव्याची साक्षांकित प्रत जोडावी.

सविस्तर माहितीसाठी पाहा. https://barti.maharashtra.gov.in या वेबसाईटवरुन 'Notice Board च्या सदराखाली Coachings- Mang- Matang लिंकवर.

**महासंचालक**
**बार्टी, पुणे.**

**Adv.29/01/2016/**

फोटो

# विहीत नमुना अर्ज

१.संपूर्ण नांव :-------------------------------------------------------------------------------------

**(आडनाव)** **(नांव )** **(वडील/ पतीचे नाव**

२.जन्मतारीख :- -----------/---------/---------

३.जात :- (अनुसूचित जाती )

४.जात (उपजात) :-

५.लिंग ( पुरुष/ स्त्री ) :-

६.पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता :- ---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

७.कायमचा पत्ता :- --------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

८.दूरध्वनी/मोबाईल क्रमांक :-

९. ई –मेल :-

१०.उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण :-

११. गुणपत्रिका (गुणांची टक्केवारी) :-

१२. पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका :-

१३.नि:समर्थ (अपंग) :- होय/नाही (होय असल्यास तपशील द्यावा)
(Person With Disability)

**ठिकाण :-**

**दिनांक.**

**उमेदवारांची स्वाक्षरी**